'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# स्त्री लोकगीतामधून दिसणारे सामाजिक जीवन
## (साने गुरुजी संपादित 'स्त्री–जीवन'आधारे)

डॉ. निशा स. नायगांवकर (जोशी)
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
ता. तिवसा, जि. अमरावती.

*लोकसाहित्याभ्यासात प्रथा, रुढी, परंपरा यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. सामाजिक प्रथा वगळून तो करताच येत नाही. स्त्री गीत निर्मित काळातील समाज आणि कुटूंब व्यवस्था, समाजाच्या धार्मिकधारणा समाजमनावर असलेल्या दैववादाचा पगडा, त्यातून प्रचलित झालेल्या रुढी–प्रथा, आचार–विचार, नीतीकल्पना आणि त्यातून स्त्रीवर पडलेली, लादलेली बंधने आणि स्त्रीला या प्रचलित समाजव्यवस्थेत दिले गेलेले गौणत्व इ. संदर्भ त्या समाजातील स्त्रीगीताला लाभलेले असतात.*

लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेचा प्रारंभ १९१६ साली झाला. याचे श्रेय कै. वि. का. राजवाडे यांना जाते. कृष्णदेव उपाध्याय लोकसंस्कृती हा शब्द योजतात. ''लोकसंस्कृतीत लोजीवनातील आचार–विचार, रुढी–प्रथा, विधी–निषेध, लोकविश्वास, कला आणि वाड्मय इ. बाबींचा समावेश होतो. लोकसाहित्यातही या बाबींचा समावेश असतोच.''[१] वर्तमानकाळात व्यवहारामध्ये लोकसत्ता, लोकशाही या शब्दामध्ये हे पद समस्त प्रजा असा होतो. भारतात वैदिक संस्कृती आणि लोकसंस्कृती असे भेद परंपरेने चालत आलेले आहेत असे स्पष्ट दिसते. वेद आणि लोक या शब्दांतून वेदाची प्रतिष्ठा जशी दर्शविली जाते तसेच लोकांचेही महत्व दाखविले जाते. समाजात परिवर्तन झाल्यावर देखील कांही लोक हे प्राचीन राहतात.

लोकगीते निरक्षरांकडून निर्माण झालेली असल्याने त्यांचा कर्ता कळत नाही. परंतु बरीचशी गीते ही स्त्रीनिर्मित आहेत.

**समाजाचा स्त्री–विषयक दृष्टिकोन :–**

स्त्रीगीतांची निर्मिती करणाऱ्या स्त्रिया पारंपरिक समाज, कुटुंब व्यवस्थेत जीवन जगणाऱ्या आहेत. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत त्यांनी जे जे भोगले, जे जे त्यांच्या अनुभवाला आले आणि पुरुषप्रधान संस्कृतीने त्यांना जे जे दिले त्यांचाच प्रांजळ आविष्कार त्यांच्या मौखिक शब्द आविष्कारातून झालेला आहे. त्यांच्या गीतांतून आविष्कृत होणारे त्यांचे जीवन व्यक्तिगत जीवनापलीकडे जाऊन, समाजाचा, काळाचा, समाज व्यवस्थेने त्यांना दिलेल्या स्थानाचा, त्यांच्या नाकारलेल्या अस्तित्वाचा वेध घेतांना दिसते. त्यामुळेच स्त्रीगीतांना सामाजिकदृष्टया एक वेगळेपण लाभलेले आहे.

**लेकीचा हा जन्म देव घालून चूकला**
**बैल घाण्याला जुंपला जन्मवैरी**
**स्त्रियांचा जन्म हा वैरी नको घालू श्रीहरी**
**परक्याची ताबेदारी जन्मवैरी**

स्त्रीजन्म म्हटला की घरकाम हे आपोआप आले अलिखित नियमच तो, पुरुष म्हटला की बाहेरची कामे स्त्री म्हटली घरकाम म्हणून 'जन्मवेरी' हा शब्द आलेला आहे. स्त्रीला जन्मभर परक्याची ताबेदारी करावी लागते. हे तिच्या जन्माच्यावेळी ठरते.

स्त्रीगीतांच्या सामाजिक पार्श्वभूमीचा विचार करताना अपरिहार्यपणे येणारी गोष्ट म्हणजे तिची धार्मिकता आहे. या धारणेतूनच स्त्रीच्या मनावर संस्कार होत असतात. धर्माचरण करण्याची जबाबदारी स्त्रीवर असल्याने तिच्यावर जास्तच बंधने आली. ही बंधने तिची तिनेच घेतली आहे. त्यामुळे खुंटयाला बांधलेल्या गाईची अवस्था तिची झाली आहे.

**देवाच्या देवळी नंदीला घाली माळ**
**मागते तान्हेबाळ उषाताई**
**शिवाची केली पूजा नंदीला कोश शेला**
**पुत्रासाठी नवस केला उषाताईने**

''पारंपरिक चौकटीत राहता राहता मग स्त्रीला ही पारंपारिक चौकटच बरी वाटते, आणि मग त्यातूनच तिच्याच परंपराप्रियता येत जाते. परंपरा पाळण्याकडे तिचा कल बनत जातो आणि पुन्हा परंपरेची ही चौकट अधिक भक्कम बनत जाते.''[२]

**देवाच्या देउळी सहज गेले होत्ये काल**
**प्रसाद दिला मला दोन मोती एक लाल**
**देवाच्या देउळी सहज गेले गाभाऱ्यात**
**प्रसाद दिला मला दोन मोती अंगाऱ्यात**

परंपरेच्या चौकटीत राहतांना तिला ती प्रिय वाटायला लागते. परमेश्वराच्या प्रसादाने आपल्याला अपत्यसुखाचा लाभ होणार आहे म्हणून त्या परमेश्वराचे ती आभार मानते. प्रत्येक प्राप्तीचे श्रेय दुसऱ्याला देण्याचा तिच्या मनाचा मोठेपणाचा प्रत्यय यातून येतो.

**स्त्री म्हणून :—**

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत अकारण सर्व पातळयावर पुरुषाला महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच जणू तो जन्मत:च श्रेष्ठ असल्याचा समज दृढ झाला. पण हा समज वा त्याला सत्याचा आधार नाही. केवळ निसर्गाचाच फरक आहे. 'ल्येकापरास ल्येक कशानं झाली उणी?एका कुशीची रत्नं दोन्ही ।।'अशी वस्तुस्थिती असताना देखील स्त्री म्हणून कराव्या लागणाऱ्या दु:खाला वाचा स्त्रीगीतातुन मिळते.

**कन्या झाली म्हणून नको घालू खाली मान**
**घडेल कन्यादान काकारायांना**
**लेका ग परीस लेक ती काय उणी**
**हिरा नव्हे हिरकणी उषाताई**

स्त्री असल्याने तिला दुय्यम स्थान आणि पुरुषाला श्रेष्ठत्व ही असमानता तिला बोचते पण याविरुद्ध आपण काही करु शकू असा विचारही शिवत नाही. दैवाला दोष देत गप्प बसते. स्त्रीला वाढवितानाच घडविली जाते. स्त्री म्हणून जन्मापासून बंधनांनी जखडली जाते. तिच्या मुलगी म्हणजे परक्याचे धन म्हणून जपली जाते,

वाढविली जाते. धर्मविधी, धर्माचरण, व्रतवैकल्ये, पूजा–अर्चा उपासना, नवस–सायास इ. धार्मिक बाबी स्त्रीच्या स्वत:च्या आत्मिक उन्नतीपेक्षा पुरुषाच्या सुखी जीवनासाठीच स्त्रीला पाळाव्या लागत.

**देई देवा मज हळदीचे तेज**
**कुंकवाचे राज्य जन्मवेरी**

स्त्रीची अशी मानसिकता तयार होण्यास समाजच जबाबदार आहे.'स्त्री जन्मत: नाही तर घडविली जाते.'असे जे म्हटले जाते ते याच अर्थाने होय. वरील ओव्यातील स्त्री पतीला आयुष्य मागते. यामागे तीची सुरक्षितता दडली आहे कारण पतीच्या पश्चात समाजात तिची किंमत सार्वजनिक मालमत्तेत तरी होत असे, नाहीतर कचऱ्यापेक्षा हिनकस जीवन तिच्या वाटयाला येत असे. समाजव्यवस्थेने हे जे जीवन तिच्या वाटयाला दिले त्यातून तिची मानसिकता तयार झाली. आणि असे जे जीवन वाटयाला येऊ नये म्हणून ती पतीसाठी आयुष्य मागते. त्याच्यासाठी नवस व्रत करते. ''स्त्रीचे हे दुबळेपण लक्षात घेऊनच, सासरी तिच्या वाटयाला येणाऱ्या दुखो:ला सामोरे जाण्याचे बळ देण्याचा प्रयत्न माहेरी केला जातो, पण त्यातून ती अधिकच दुबळी बनविली जाते. तिच्यावर माहेरी संस्कार केला जातो.''[३]

**दळण:—**

जात्यावरील दळण दळताना बहुतांश ओव्या, गीत निर्माण झाली आहेत. जात्याला जणू एखादी मैत्रिण समजून आपली सुखदु:खे कथन केली जात.

**दळण सडण नित्य माझे ग खेळणं**
**माझ्या मायेने वळण लावीयले**
**दळण सडण नित्य माझे ग खेळण**

माणसाला जेव्हा एखादे दु:ख, वेदना सतत, अपरिहर्यपणे छळत राहते, तीतून बाहेर पडायचे व्यावहारिक स्थूल मार्गच सापडत नाहीत आणि ती दु:खे सहन करणे एवढा एकच मार्ग असतो, तेव्हा माणूस त्यावर आपोआप उतारा शोधतो. आणि तो असतो मानसिक दृष्टया विरेचनाचा.

जात्याला आणली मैत्रिण समजून आपले दु:ख कथन करावयाचे यात दुहेरी कार्य साध्य होते. ओवी म्हटल्याने कामही हलके होते आणि मनही होते. सासरबद्दल माहेरी कोणी ऐकणारे नसते. कारण सासरी गेलेल्या मुलीने तक्रार करणे म्हणजे नावाला बट्टा लावणे.

**दळण दळावे जसा चंदन विसावा**
**माउलीला ग पुसावे कसा परदेश कंठावा**
**नाकीच्या नथीला नको लावू टीकफूली**
**आपण गृहस्थाच्या मुली उषाताई**

दळणाचे कौशल्य आदी सर्वावर जात्याच्या पेडाचे आर्वतन आर्वतन अवलंबून असते. जिथून पेडावर ठोकलेला खुंटा फिरायला सुरुवात होते. जात्यावरील ओवीचा एक चरण पुरा होतो.

**सामाजिक प्रथा रुढीवर प्रकाश :—**

लोकसाहित्याभ्यासात प्रथा, रुढी, परंपरा यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. सामाजिक प्रथा वगळून तो करताच येत नाही. स्त्री गीत निर्मित काळातील समाज आणि कुटूंब व्यवस्था, समाजाच्या धार्मिकधारणा समाजमनावर असलेल्या दैववादाचा पगडा, त्यातून प्रचलित झालेल्या रुढी–प्रथा, आचार–विचार, नीतीकल्पना

आणि त्यातून स्त्रीवर पडलेली, लादलेली बंधने आणि स्त्रीला या प्रचलित समाजव्यवस्थेत दिले गेलेले गौणत्व इ. संदर्भ त्या समाजातील स्त्रीगीताला लाभलेले असतात.

भरल्या घराचा उल्लेख गोठा, गाई—वासरे या गोष्टी कृषिसंस्कृतीत शेतीच्या अनुषंगाने जो जीवनक्रम रुढ झाला त्यात 'घर' हेच तिचे क्षेत्र टरविले गेले. कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी धान्य साठविणे, निवडणे—टिपणे, दळण—कांडण, रांधणे, कुटुंबातील लहान—थोर व्यक्तीचे संगोपन करणे, वडीलधाऱ्याची सेवा करणे, कुटुंबातील धर्मविधी संसकारविधी पाळणे इ. हे स्त्रीचे कतव्य मानले जाई. त्यातूनच सण उत्सवाशी तिचा संबंध हा पुरुषांपेक्षा अधिक यायचा म्हणून तिच्या गीतात त्याचे प्रतिबिंब पडलेले दिसते. नागपंचमीचा सण म्हणजे आनंदाचे भरते. त्यामध्ये एखाद्या कोकणातल्या मुलीला देशावर दिले असेल तर तिच्या गीतातून दोन्ही भागातल्या साजऱ्या होणाऱ्या सणातील फरकावर प्रकाश पडतो. ''नागपंचमीला, नको चिरु भाजीपाला। दया शिकवू हाताला आज सये।'' याप्रमाणे ही स्त्री तिच्या भावाला विनवणी करते की बारा महिने न्यायला आला नाहीस तरी चालेल पण नागपंचमीला सोडू नको.

**स्त्री—जीवन मधील ओव्यातून दिसणारी कल्पकता:—**

या गीतांमधून दिसणाऱ्या स्त्रीला सृष्टी आणि निसर्ग यांचे अतूट नाते याची या तीला जाणीव आहे. ''पाऊस पडतो, थांबे ना पागोळी। धरणीमाय हिरवी चोळी, घालीतसे।।'' या ओवीतून तिची कल्पकता दिसते. वसुंधरेचे हिरवेपण म्हणजे तिचे वस्त्रप्रावरण होय असेच तिला सूचवायचे दिसते. मेघ म्हणजे जणू पृथ्वीचा पती कारण मेघ बरसल्यावर ती सर्व शृगार स्वत:ला लेऊन घेते. सृजनाचा सोहळा सुरु होतो. वर्षा ऋतुच्या आगमनानंतर सृष्टीला आलेले हिरवे रुप म्हणजे तिने हिरव्या रुमालाने तोंड झाकले. ही कल्पना देखील किती सुंदर आहे लज्जा हा स्त्रीचा अलेकार आणि पृथ्वीचे जणू अनुनयासाठी धारण केला. तिच्या कल्पकतेची भरारी दिसून येते मेघ म्हणजे समुद्राचा पुत्र होय. यात पावसाच्या चक्राचे किती सूचकतेने वर्णन केले आहे. तसेच स्त्रीच्या प्रतिभेची झेप देखील येते. वसुंधरा आणि निसर्ग यांचे अतूट नाते आहे. ऋतू आगमनानंतर त्याच्या चक्रानुसार तिच्यामध्ये होणारे परिवर्तन म्हणजे जणू तिचे सजणे सवरणे, मोहरणे, फुलणे आणि पुन्हा वैराग्य हे सर्व म्हणजे मानवीय भावभावनाचे आरोपण पृथ्वीवर केले आहे. स्त्री आणि निसर्ग यांचे आंतरिक असणारे नाते यांचा प्रत्यय यातून होतो आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. विद्या व्यवहारे, लोकसाहित्य लोकसंस्कृती, १ ली आ., पुणे, २००२, पृ.क्र. ९.

२. विद्या व्यवहारे, लोकसाहित्य संस्कृती. पृ. क्र. ७४.

३. विद्या व्यवहारे, लोकसाहित्य संस्कृती. पृ. क्र. १००.